# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.11.2025** **वारःसोमवार**

---

१.कैंद्रिय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेत आज उत्तर विभागीय मंडळाची बैठक
२.बिहारमध्ये सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग
३.लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांचं मत
४.चीनच्या बॉम्बर विमानांची दक्षिण चीन समुद्रात टेहळणी
आणि
५.मध्य भारतात दोन दिवस थंडीची लाट तर दक्षिण भारतात जोरदार पावसाचा अंदाज

**अमितशहा**

कैंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेत आज हरियाणातील फरीदाबाद इथं उत्तर विभागीय मंडळाची बैठक होणार आहे. पंजाब, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री, दिल्ली, जम्मू काश्मीर आणि लडाखचे नायब राज्यपाल तसंच चंदीगडचे प्रशासक या बैठकीत सहभागी होतील. या बैठकीत राज्य सरकारांमधला समन्वय, जल वितरणाचा मुद्दा आणि विकास कामांबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे.

**बिहारनिकाल**

बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर काल राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त विनोद सिंग गुंजियाल यांनी २४३ नवनिर्वाचित आमदारांच्या नावांची यादी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्याकडे सुपुर्द केली. यामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या २०२, महागठबंधनच्या ३४ तसंच एआयएमआयएम, बसपा आणि इंडियन इन्क्लुझिव्ह पार्टीच्या आमदारांचा समावेश आहे.

**बिहारसत्ता**

दरम्यान, राज्यात सत्तास्थापनेसाठीच्या राजकीय हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांच्या पाटण्यासह नवी दिल्लीत होणाऱ्या अनेक बैठकांमध्ये मंत्रीमंडळाची रचना आणि मंत्रीपदांबाबत चर्चा सुरू आहे. आघाडीत भाजपाकडे सर्वात जास्त ८९ आमदार असून नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाचे ८५ आमदार निवडून आले आहेत. चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीचे १९, हिंदुस्तानी आवाम मोर्चाचे ५ आणि राष्ट्रीय लोक मोर्चाच्या ४ उमेदवारांनी ही निवडणूक जिंकली आहे.

संयुक्त जनाता दलाचे आमदार आज पाटणा इथं होणाऱ्या बैठकीत आपला नेता निवडतील. भाजपदेखील आजच नेता निवडणार असून त्यानंतर एनडीएची एकत्रित बैठक होईल.

२० नोव्हेंबरला नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी पाटण्यातल्या गांधी मैदानावर होणार आहे.

**दुबईएअरशो**

यावर्षीचा दुबई एअर शो आजपासून सुरू होत आहे. भारतीय वायु दल आपल्या सुर्यकिरण एरोबॅटीक पथक आणि तेजस या हलक्या लढाऊ विमानांसह यामध्ये सहभागी होणार आहे. संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करणार असून ते संयुक्त अरब अमीरातीच्या संरक्षण मंत्र्यांसोबत यावेळी द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

भारतासह ५० देशांमधल्या कंपन्यांच्या प्रतिनिधींचा सहभाग असलेल्या संरक्षण सामग्री उत्पादन आणि तंत्रज्ञानविषयक सहकार्य वाढवण्याबाबतच्या गोलमेज परिषदेत सेठ अध्यक्ष म्हणून सहभागी होणार आहेत.

**राष्ट्रीय वृत्तपत्र दिन**

लोकशाहीमध्ये पत्रकारितेची भूमिका महत्त्वाची आहे, असं मत केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत राष्ट्रीय वृत्तपत्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केलं. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन, प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यावेळी उपस्थित होत्या. पत्रकारितेमध्ये प्रामाणिकपणा, चिकाटी आणि अचूक माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याची वचनबद्धता हवी, तसंच सत्याचा शोध घेण्याचं धैर्य हवं असं रंजना प्रकाश देसाई यावेळी म्हणाल्या.

**गोयल-प्लास्टिक**

भारताच्या राष्ट्रीय शाश्वतता धोरणानुसार आणि पर्यावरणाला अनुकूल उत्पादनांच्या वाढत्या जागतिक मागणीनुसार, प्लास्टिकचा १०० टक्के पुनर्वापर सुनिश्चित करण्यासाठी प्लास्टिक उद्योगानं, निर्णायक पाऊल उचलावं असं आवाहन वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी केलं. मुंबईत प्लेक्सकॉनसिलच्या निर्यात उत्कृष्टता पुरस्कार आणि प्लॅटिनम जयंती समारंभात ते काल बोलत होते. शाश्वत प्लास्टिक उत्पादनात जागतिक नेता म्हणून उदयाला येण्याची भारताची क्षमता असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. प्रगत तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण कच्चा माल आणि जबाबदार उत्पादन पद्धतींमध्ये गुंतवणूक करण्याचं त्यांनी उद्योगांना आवाहन केलं.

**चीनफिलिपिन्स-पूल-सुरेखा**

चीनच्या लष्करानं काल वादग्रस्त दक्षिण चीन समुद्रात आपल्या लढाऊ विमानांसह पहिल्यांदाच बॉम्बर फॉर्मेशन टेहळणी केली. फिलिपिन्सच्या नौदलानं अमेरिका आणि जपानसोबत संयुक्त टेहळणी केल्यानंतर फिलिपिन्सला इशारा देण्यासाठी चीननं ही टेहळणी केली.

दक्षिण चीन समुद्रावर आपला हक्क सांगणाऱ्या चीनचा फिलिपिन्स, व्हिएतनाम, मलेशिया, ब्रुनेई आणि तैवान या देशांसोबत अनेक वर्षांपासून सागरी हद्दीबाबतचा वाद आहे. प्रमुख आंतरराष्ट्रीय व्यापारी मार्ग असणाऱ्या या समुद्री क्षेत्रावर हे सर्व देशदेखील आपला हक्क सांगत आहेत.

**शरणार्थीधोरण**

युनायटेड किंग्डममधली शरणार्थी प्रणाली नियंत्रणाबाहेर गेली असून त्याचा फटका स्थानिक समुदायांना मोठ्या प्रमाणात बसत असल्याचं युकेच्या गृह मंत्री शबाना महमूद यांनी म्हटलं आहे. शरणार्थ्यांना कायम रहिवासी प्रमाणपत्र देणं बंद करण्यात आल्याचं जाहीर करुन त्यांना दर अडीच वर्षांनी यासाठी नव्यानं अर्ज करावा लागेल असं त्यांनी जाहीर केलं. ज्या शरणार्थ्यांच्या मूळ देशात सुरक्षा व्यवस्था पुनर्स्थापित झाली आहे त्यांना आपल्या देशात परत जावं लागेल असं त्यांनी सांगितलं.

युकेमध्ये शरणार्थ्यांना सध्या पाच वर्षांसाठी आसरा दिला जातो. त्यानंतर ते अमर्यादित काळासाठी राहण्याची परवानगी मागू शकतात आणि त्यामुळे त्यांना ब्रिटीश नागरिकत्व मिळवता येऊ शकतं. आता नव्या नियमावलीनुसार ब्रिटीश नागरिकत्व मिळण्यासाठी त्यांना २० वर्ष वाट पहावी लागणार आहे.

**लिबिया**

लिबियामध्ये,अल-खुम्स या शहराजवळ स्थलांतरितांना घेऊन जाणाऱ्या दोन नौका उलटल्यानं चार जणांचा मृत्यू झाला. पहिल्या नौकेत बांगलादेशचे २६ जण होते,तर दुसऱ्या नौकेत ६९ जण होते. संघर्ष आणि गरीबीपासून सुटका करून घेण्यासाठी युरोपात जाणारे स्थलांतरित मुख्यतः लिबिया मार्गाद्वारे प्रवास करतात.

**उपराष्ट्रपती**

देशाला २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्यासाठी माध्यम कर्मीनीही राष्ट्र उभारणीत योगदान द्यावं असं आवाहन उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांनी केलं आहे. ते काल हैदराबाद इथं पहिल्या रामोजी सर्वोत्कृष्टता पुरस्कार समारंभात बोलत होते. ग्रामीण विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञान यासह सात क्षेत्रांमधील योगदानासाठी हे पुरस्कार देण्यात आले.

**केरळ**

केरळमध्ये,मतदार यादीचं विशेष पुनरीक्षण सुरू आहे. या अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ६३ लाखांहून अधिक मतदारांना गणना नोंदणी अर्ज वितरित करण्यात आले आहेत, असं मुख्य निवडणूक अधिकारी रथन केळकर यांनी सांगितलं. एकंदर मतदार संख्येच्या सुमारे ९४ टक्के लोकांना हे अर्ज देण्यात आले आहेत. संपूर्ण माहिती प्रणालीमध्ये अद्ययावत झाल्यानंतर ही संख्या वाढण्याची शक्यता आहे असंही केळकर यांनी सांगितलं. भारतीय निवडणूक आयोगानं या महिन्याच्या ४ तारखेला नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये पुनरीक्षणाचा दुसरा टप्पा सुरू केला आहे.

**एनआयए**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आमीर राशीद अली, या कश्मिरच्या रहिवाश्याला दिल्लीत अटक केली. अमीर यानं, उमर नबी याच्यासोबतीनं स्फोटाचा कट रचला होता, असं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या स्फोटात वापरलेल्या कारची नोंदणीही आमीर याच्या नावावर होती अशी माहिती तपास यंत्रणेनं दिली आहे. दरम्यान, लाल किल्ला मेट्रो स्टेशन प्रवाशांसाठी पुन्हा खुलं करण्यात आलं आहे.

**नक्षलवादी**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्हयात काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दोन महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे.

या तिघांवर १५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. घटनास्थळावरून एक रायफल, इतर शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं जप्त करण्यात आली आहेत.

**हवामान**

आज आणि उद्या मध्य महाराष्ट्र, विदर्भासह छत्तीसगड, राजस्थान आणि मध्य प्रदेशात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर तमिळनाडू, पुदुच्चेरी, कराईकल, आंध्र प्रदेश, केरळ आणि माहेमध्ये तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.